मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेची अतिक्रमण निर्मूलन मोहीम

## रस्ता रुंदीकरणासाठी 41 अनधिकृत झोपड्यांवर कारवाई; अतिक्रमण हटविण्याची मोहीम तीव्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या वाकड-म्हातोबानगर येथील २४ मीटर डिपी रस्त्यावरील १५०० चौरस मीटर जागेवरील ४१ अनधिकृत झोपड्या तसेच बांधकामांवर निष्कासनाची कारवाई केली. रस्ता रुंदीकरणाच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे उपआयुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, कार्यकारी अभियंता आर. व्ही. शिंदे, दळणवळण विभागाचे कार्यकारी अभियंता चंद्रकांत मोरे यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका स्थापत्य, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग, प्रशासन व स्थापत्य, शहरी दळणवळण विभाग, नगररचना विभाग, विद्युत विभाग, अतिक्रमण विभाग, अग्निशामक व महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली.



### नियोजनबद्ध शहर विकासासाठी नागरिकांचे सहकार्य गरजेचे

» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात विविध सार्वजनिक सुविधा, रस्ते व पायाभूत प्रकल्पांसाठी जागा आरक्षित करण्यात आलेली आहे. शहराचा नियोजित आणि सुटसुटीत विकास साधण्यासाठी या आरक्षित जागा अतिक्रमणमुक्त ठेवणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी विकास आराखड्यातील आरक्षित जागांवर कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमण करू नये. तसेच, आरक्षित जागांवरील अतिक्रमणांमुळे भविष्यात विकासकामांमध्ये अडथळे निर्माण होतात आणि अशा अतिक्रमणांवर नियमानुसार निष्कासनाची कारवाई केली जाईल, याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी. नियोजनबद्ध शहर विकासासाठी नागरिकांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

> पिंपरी चिंचवड शहरातील प्रमुख रस्ते व सार्वजनिक सुविधा सक्षम, सुरक्षित आणि दीर्घकालीन दृष्टीने सक्षम करण्यासाठी अतिक्रमण हटविणे अत्यावश्यक आहे. शहराची वाढती लोकसंख्या, वाहतुकीचा ताण आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता रस्ते रुंदीकरण ही केवळ प्रशासकीय कारवाई नसून नागरिकांच्या दैनंदिन जीवनमान उंचावण्याशी थेट संबंधित बाब आहे. अशा कारवायांना नागरिकांनी सहकार्य केल्यास अशा कारवाया अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक पद्धतीने राबविता येतील. शहर अधिक सुंदर, सुबक आणि सुसज्ज करण्यासाठी प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची असून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि भविष्यातील सोयीसुविधांसाठी महापालिकेच्या अशा उपक्रमांना सकारात्मक प्रतिसाद देत रस्ता रुंदीकरण कारवाईस नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करतो.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

# पिंपरीत रक्ताचा तुटवडा; वाढत्या मागणीमुळे रुग्णालये अडचणीत

## नागरिकांना रक्तदान करण्याचे आवाहन; प्लेटलेट्सचीही कमतरता जाणवते

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत शहराचा वाढलेला विस्तार आणि लोकसंख्या; तसेच वाढलेली रुग्णसंख्येमुळे रक्ताची गरजही वाढली आहे. मात्र, त्या तुलनेत रक्तदाते मिळत नसल्याने रक्तपेढ्यांत रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे.

शहरात सुमारे ८ ते १० रक्तपेढ्या आहेत. यातून शहरातील विविध रुग्णालयांना मागणीनुसार रक्तपुरवठा करण्यात येतो. रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा साठा कमी झाला आहे. कर्करोग, डेंगूच्या रुग्णांची वाढती संख्या आणि शस्त्रक्रियांसाठी रक्ताची मागणी वाढली आहे. रक्तपेढ्या आणि रुग्णालये रक्तदात्यांच्या शोधात आहेत. त्यामुळे नागरिकांनी रक्तदान करावे, असे आवाहन रक्तपेढ्यांकडून केले जात आहे.

सध्या परीक्षांचा कालावधी आहे. त्यानंतर एप्रिलच्या अखेर आणि मे महिन्यात सुट्यांच्या कालावधीत रक्तदान शिबिरे कमी घेतली जातात. त्यामुळे शिबिराअभावी रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. पुढील काही दिवस पुरेल इतकाच साठा रक्तपेढ्यांमध्ये उपलब्ध असल्याने तुटवडा वाढण्याच्या भीतीने रुग्णालयांसह रक्तपेढ्यांनी दात्यांचा शोध सुरू केला आहे. शहरात प्रदूषण, त्यासोबत सध्या कर्करोग, डेंगूच्या रुग्णांची संख्याही वाढली आहे. रुग्णालयांमधून रक्त आणि रक्ताच्या विविध घटकांची मागणी होऊ लागली आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी पडू लागला आहे. शहरातील मोठ्या रुग्णालयांसह अन्य छोट्या-मोठ्या रुग्णालयांच्या रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे.



> रक्ताचा तुटवडा एप्रिल महिन्यापासूनच सुरू झाला आहे. चार दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा आहे. रक्तदान शिबिरे घेण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत. दररोज 50 पिशव्यांची गरज असते आणि 30 पिशव्या उपलब्ध असतात. त्यामुळे एखाद्याला शस्त्रक्रिया करायची असेल तर ती पुढे ढकलावी लागते.
>
> - दीपक पाटील, प्रशासकीय अधिकारी, पिंपरी सिरॉलॉजिकल इन्स्टिट्यूट ब्लड सेंटर

# लोणावळ्यात स्मार्ट सिटी धर्तीवर विकास आराखड्यास गती..!

## रस्ते सुशोभीकरण व ट्रॅफिक व्यवस्थापनावर भर; आमदार सुनील शेळके यांच्या पुढाकारातून निर्णायक बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोणावळा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. मुंबई-पुणे या दोन महानगरांच्या मध्यवर्ती ठिकाणी व निसर्गसौंदर्याने नटलेल्या लोणावळा शहराला पाश्चिमात्य देशांच्या धर्तीवर जागतिक ओळख मिळावी, या दृष्टीने विविध विकासात्मक मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली.

या बैठकीत शहरातील प्रमुख रस्त्यांचे सुशोभीकरण, ट्रॅफिक व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, फूटपाथ सुधारणा, भूमिगत विद्युतवाहिन्या, पथदिवे, पार्किंग झोन, पिण्याच्या पाण्याचे नियोजन, अतिक्रमण नियंत्रण, जंक्शन सुधारणा तसेच हॉकर्स झोन निर्मिती यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींचा आराखडा सादर करण्यात आला. विशेष म्हणजे, AI तंत्रज्ञानाच्या सहाय्याने CCTV द्वारे वाहतूक व सुरक्षा नियंत्रण अधिक प्रभावी करण्यावरही भर देण्यात आला. याचबरोबर 2027 मध्ये होणाऱ्या "PUNE GRAND TOUR CYCLE RACE" या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा मार्ग मावळ तालुक्यातून जाणार असून, जागतिक दर्जाचे खेळाडू लोणावळ्यात येणार असल्याने शहराच्या पर्यटन व आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत निर्णायक ठरली.



### आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वात विकासाला गती

» आमदार सुनील शेळके यांच्या पुढाकारामुळे या विकास आराखड्याला गती मिळाली आहे. शहरात नवीन प्रकल्प, उद्योग-व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी त्यांचे प्रयत्न अधोरेखित झाले. नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे आणि सर्वपक्षीय नगरसेवकांनीही या आराखड्याला सकारात्मक प्रतिसाद देत शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकमताने पाठिंबा दर्शविला.

या बैठकीत आमदार सुनील शेळके यांची उपस्थिती विशेष ठरली. लोणावळा शहराच्या विकासासाठी त्यांची असलेली तळमळ आणि दूरदृष्टी पुन्हा एकदा अधोरेखित झाली. शहरात नवीन प्रकल्प यावेत, उद्योग-व्यवसायाला चालना मिळावी व स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, यासाठी आमदार शेळके सातत्याने पुढाकार घेत असल्याचे यावेळी स्पष्ट झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली लोणावळ्याचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होत असल्याचेही दिसून आले.

बैठकीस लोणावळा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमताने या विकास आराखड्यास सकारात्मक प्रतिसाद देत लोणावळा शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास व्यक्त केला. या सकारात्मक पुढाकाराबद्दल सर्व नगरसेवकांच्या वतीने जिल्हाधिकारी महोदयांचे आभार व्यक्त करण्यात आले.

### AI तंत्रज्ञानासह स्मार्ट शहराची संकल्पना

» लोणावळा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. शहरात AI-आधारित CCTV प्रणालीद्वारे वाहतूक आणि सुरक्षेवर नियंत्रण ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. यासोबतच ट्रॅफिक व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे. या उपाययोजनांमुळे शहर अधिक सुरक्षित, सुबक आणि आधुनिक बनवण्याचा उद्देश आहे.

### पायाभूत सुविधांचा व्यापक आराखडा

» बैठकीत रस्ते सुशोभीकरण, फूटपाथ सुधारणा, भूमिगत विद्युतवाहिन्या, कचरा व्यवस्थापन, पार्किंग झोन, जंक्शन सुधारणा आणि हॉकर्स झोन यांसारख्या विविध प्रकल्पांचा सविस्तर आराखडा मांडण्यात आला. पिण्याच्या पाण्याचे नियोजन आणि अतिक्रमण नियंत्रणावरही विशेष लक्ष देण्यात येणार आहे. 2027 मधील आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेमुळे पर्यटनाला चालना मिळणार असल्याने शहराचा दर्जा

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत रिक्त पदांचा प्रश्न गंभीर

## महानगरपालिका प्रशासनाला भरती प्रक्रिया तातडीने राबवण्याचे महापौर रवी लांडगे यांचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्यामुळे रिक्त पदांचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर महापौर रवि लांडगे यांनी प्रशासनाला तातडीने रिक्त पदे भरण्याचे निर्देश दिले आहेत.

महापौरांनी म्हटले आहे की, शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता प्रशासनिक यंत्रणा सक्षम राहणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या अनेक विभागांमध्ये मनुष्यबळाची कमतरता जाणवत असून त्याचा थेट परिणाम नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांवर होण्याची शक्यता आहे.





यासाठी सर्व विभागांनी विद्यमान तसेच आगामी काळात रिक्त होणाऱ्या पदांची सविस्तर माहिती तात्काळ सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच आवश्यक पदांसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवून भरती प्रक्रिया गतीमान करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. महापौर कार्यालयाकडून या प्रक्रियेवर नियमित पाठपुरावा केला जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील अनेक अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्याने विविध विभागांमध्ये रिक्त पदांची संख्या वाढत आहे. या परिस्थितीमुळे प्रशासनावर ताण निर्माण होत असून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि वाढते कामकाज लक्षात घेता सक्षम मनुष्यबळाची आवश्यकता अधिक अधोरेखित झाली आहे. आवश्यक पदांसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवून भरती प्रक्रिया जलदगतीने राबवण्यावर भर देण्यात आला आहे. महापौर कार्यालयाकडून या प्रक्रियेवर नियमित पाठपुरावा केला जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

> "शहराचा झपाट्याने होत असलेला विकास आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता सक्षम प्रशासन ही काळाची गरज आहे. रिक्त पदांमुळे नागरिक सेवेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सर्व पदांची भरती तातडीने करण्यात यावी. तसेच या प्रक्रियेत कोणताही विलंब न होता शासनाकडे प्रस्ताव सादर करून मंजुरी मिळवावी, यावर महापालिकेने प्राधान्याने कार्यवाही करावी."
>
> - रवि लांडगे, महापौर,
> पिंपरी चिंचवड महापालिका

# समाविष्ट गावांतील बांधकाम परवानगीचा तिढा सुटला

## समाविष्ट 23 गावांतील बांधकाम परवानग्यांना गती; 60 दिवसांत निर्णय बंधनकारक

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत समाविष्ट २३ गावांसाठीचे नियोजन प्राधिकरण म्हणून राज्य शासनाने पुणे महापालिकेला अधिकार दिले आहेत. असे असतानाही पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कडून अद्यापही बांधकाम परवानगीसाठी आलेली प्रकरणे महापालिकेसही दिलेली नाहीत त्याबाबत निर्णयही घेतलेला नाही. त्यामुळे या गावांमधील बांधकाम परवानग्या रखडल्या असून पीएमआरडीए कडून महापालिकेकडे आलेल्या समाविष्ट गावांमधील बांधकाम परवानगी प्रस्तावांवर ६० दिवसांच्या आत मंजुरी अथवा नामंजुरी देण्याची कार्यवाही करावी, असे आदेश नगरविकास विभागाने दिले आहेत.

राज्य शासनाने काढलेल्या अधिसूचनेच्या दिनांकापासून हा कालावधी विचारात घ्यावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे समाविष्ट गावांमधील रखडलेल्या बांधकाम प्रस्तावांना गती मिळण्याची शक्यता आहे. शासनाकडून राज्यातील हद्द बदल करण्यात आलेल्या सर्वच नियोजन प्राधिकरणासाठी हा आदेश काढण्यात आला आहे. मात्र, इतर प्राधिकरणांसाठी नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार दिलेल्या अधिसूचनेपासून साठ दिवसांचा कालावधी दिला आहे.

तर पीएमआरडीएसाठी मात्र या नवीन अधिसूचनेनंतरचा ६० दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. २०२१ मध्ये समाविष्ट झालेल्या २३ गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार पूर्वी पीएमआरडीएकडे होते. मात्र, गतवर्षी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे अधिकार महापालिकेकडे देण्याचे निर्देश दिल्यानंतर नगरविकास विभागाने दि. ११ फेब्रुवारीला अधिसूचना काढून पीएमआरडीएकडे असलेले विशेष नियोजन प्राधिकरणाचे अधिकार महापालिकेला हस्तांतरित केले.

मात्र, अधिसूचना जाहीर होऊन जवळपास दोन महिने उलटूनही पीएमआरडीएकडून संबंधित कागदपत्रे व अभिलेख महापालिकेला उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे बांधकाम परवानगी तसेच टीडीआर वापरासंबंधी अनेक प्रस्ताव प्रलंबित राहिले होते. त्याबाबत शासनाकडे मोठ्या प्रमाणात तक्रारीही करण्यात आलेल्य होत्या. त्यानंतर आता सर्व विकास परवानगी प्रस्तावांवर ६० दिवसांच्या कालावधीत निर्णय घेणे बंधनकारक केले आहे.




### पीएमआरडीएकडून कागदपत्रे न मिळाल्याने अडथळे

» महापालिकेला नियोजन प्राधिकरणाचा दर्जा मिळूनही पीएमआरडीएकडून आवश्यक कागदपत्रे आणि अभिलेख अद्याप हस्तांतरित करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे बांधकाम परवानगी आणि टीडीआर वापरासंदर्भातील अनेक प्रस्ताव प्रलंबित राहिले होते. या प्रशासकीय विलंबामुळे विकासकामांवर परिणाम झाला असून नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता.

### प्रलंबित प्रस्तावांवर निर्णयाची सक्ती

» महापालिकेत समाविष्ट २३ गावांतील बांधकाम परवानगी प्रस्तावांवर ६० दिवसांच्या आत निर्णय घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्य शासनाने नगरविकास विभागामार्फत यासंदर्भात स्पष्ट आदेश दिले असून, अधिसूचनेच्या दिनांकापासून हा कालावधी लागू होणार आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून रखडलेले बांधकाम प्रस्ताव मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिक आणि विकासकांकडून होणाऱ्या तक्रारींची दखल घेत हा निर्णय घेण्यात आला आहे.

### अधिसूचनेनंतर प्रक्रियेला वेग

» २०२१ मध्ये समाविष्ट गावांवरील अधिकार पूर्वी पीएमआरडीएकडे होते. मात्र, अधिसूचनेद्वारे हे अधिकार महापालिकेकडे देण्यात आले. तरीही अंमलबजावणीत विलंब होत असल्याने शासनाने आता ६० दिवसांची मर्यादा निश्चित केली आहे. या निर्णयामुळे प्रशासनावर जबाबदारी वाढली असून, समाविष्ट गावांतील विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# होर्डिंगवर आता 'क्यूआर कोड' सक्तीचा! पीएमआरडीएची मोठी कारवाई

## बेकायदा होर्डिंगवर पीएमआरडीएची धडक मोहीम; नियम धाब्यावर बसवणाऱ्या होर्डिंगधारकांना महानगर आयुक्तांचा शेवटचा इशारा.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत बेकायदा आणि धोकादायक होर्डिंगचे फुटलेले पेव आता मोडीत काढले जाणार आहे. महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी यासंदर्भात अतिक्रमण निर्मूलन विभागाला कठोर कारवाईचे आदेश दिले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या होर्डिंगधारकांवर थेट कारवाई केली जाणार आहे. दरम्यान, अनधिकृत होर्डिंगधारकांना रीतसर परवानगी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ही शेवटची संधी असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

पीएमआरडीएच्या हद्दीतील मुळशी, मावळ, हवेली, खेड आणि शिरूर या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदा होर्डिंग उभारण्यात आले आहेत. यासंदर्भात नागरिकांच्या वाढत्या तक्रारींची दखल घेत, सोमवारी आकुर्डी येथील मुख्यालयात महानगर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीस विकास परवानगी विभागाचे संचालक अविनाश पाटील, उपायुक्त आशा होळकर आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महानगराचे विद्रूपीकरण रोखण्यासाठी आणि संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी आता होर्डिंगसाठी ऑनलाइन परवानगी प्रक्रिया राबवली जाणार आहे. यापुढे प्रत्येक अधिकृत फलकावर क्यूआर कोड आणि जिओ फेन्सिंग असणे बंधनकारक असेल. ज्यांचे अर्ज त्रुटींमुळे प्रलंबित आहेत किंवा ज्यांनी अद्याप शुल्क (चलन) भरलेले नाही, त्यांना परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याची ही अंतिम संधी असेल. ज्यांना नोटिसा बजावूनही त्यांनी अनधिकृत फलक हटवलेले नाहीत, त्यांच्यावर याच आठवड्यापासून निष्कासनाची धडक मोहीम उघडली जाणार आहे.




### महानगर आयुक्तांचे महत्त्वाचे निर्देश

- होर्डिंग परवानगीसाठी ऑनलाइन प्रणालीचा अवलंब करावा
- मुदतीत बेकायदा होर्डिंग न काढल्यास प्रशासनातर्फे काढले जातील
- वारंवार सूचना देऊनही टाळाटाळ करणाऱ्यांवर कारवाई
- अपूर्ण प्रस्तावांबाबत नियमानुसार तात्काळ प्रक्रिया पूर्ण करावी.

### होर्डिंगधारकांशी ९ एप्रिलला चर्चा

» प्रशासनाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी आणि एजन्सींचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी महानगर आयुक्तांनी गुरुवारी (ता. ९) दुपारी १:३० वाजता विशेष बैठकीचे आयोजन केले आहे. ही बैठक आयुक्तांच्या दालनात पार पडणार असून, त्यानंतर कठोर अंमलबजावणीला सुरुवात होईल.

# बारामती पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी राजकीय घडामोडींना वेग

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना महायुतीतील प्रमुख नेते उपस्थित होते.

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि काँग्रेसचे आकाश मोरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असताना, ही निवडणूक बिनविरोध होण्यासाठी महायुतीतील नेते कामाला लागले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे हे काँग्रेसच्या केंद्रीय नेत्यांच्या संपर्कात असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसला उमेदवारी मागे घेण्याचे आवाहन केले आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना महायुतीतील तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते उपस्थित होते. त्यावेळी ही निवडणूक बिनविरोध होण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे महायुतीच्या नेत्यांनी स्पष्ट केले.

काँग्रेसच्या उमेदवाराने माघार घ्यावी, यासाठी काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींच्या संपर्कात असल्याबाबत सुनील तटकरे म्हणाले, 'सर्वच पक्षांना ही निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी आवाहन केले आहे. काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला आहे. अर्ज मागे घेण्याच्या मुदतीपर्यंत सर्वांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करणार आहोत. निवडणूक लादली गेली तर बारामतीकरांना विनंती आहे की, देशाच्या विधानसभा निवडणुकीत विक्रमी मतांनी विजय झाला नसेल तितक्या विक्रमी मतांनी सुनेत्रा पवार यांना निवडून द्यावे.'



'ही निवडणूक बिनविरोध होण्यासाठी प्रयत्न करत आहोत. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याशी संपर्क साधण्यात येत आहे.' असे प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, 'ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी आमची इच्छा आहे. अन्य पक्षांनीही तेच करावे. दु:खद घटना घडल्यास निवडणूक बिनविरोध करण्याची प्रथा इतर पक्षांनीही पुढे न्यावी.'

बावनकुळे म्हणाले,'काँग्रेसने निवडणूक लढवू नये, ही जनभावना आहे. काँग्रेसने महाराष्ट्राचे संस्कार जपले पाहिजेत. अजित पवार यांचा जीवन प्रवास काँग्रेसबरोबर राहिला आहे. त्यामुळे बारामतीमध्ये काँग्रेस पक्षाने निवडणूक लढवू नये, अशी विनंती आहे. काँग्रेसला संस्कार आणि संस्कृती राहिली नसेल, तर त्यांनी लढावे.'

### नेत्यांचे आवाहन आणि भूमिका

**» महायुतीतील प्रमुख नेत्यांनी ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी काँग्रेसला आवाहन केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दु:खद घटनेच्या पार्श्वभूमीवर निवडणूक बिनविरोध करण्याची परंपरा पुढे नेण्याची गरज व्यक्त केली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही काँग्रेसने महाराष्ट्राचे संस्कार जपत निवडणूक लढवू नये, असे सांगितले. प्रफुल्ल पटेल यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याशी संपर्क सुरू असल्याचे स्पष्ट केले.**

### सुनेत्रा पवार यांचे भावनिक आवाहन

**» उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामतीकरांना भावनिक आवाहन केले. त्या म्हणाल्या, 'अजित पवार यांचा बारामती हा श्वास होता. त्यांची जागा कुणीच घेऊ शकत नाही, मात्र, त्यांचा विकासाचा वारसा मी पुढे नेईन. ही निवडणूक माझी नसून बारामतीकरांची आहे. दादांपेक्षा काकणभर जास्त साथ द्या. चार वेळा मुख्यमंत्री झालेले ज्येष्ठ नेते शरद पवार यांची मी सून, तर सहा वेळा उपमुख्यमंत्री झालेल्या अजितदादांची मी पत्नी आहे. गेली ४० वर्षे मी पवार परिवाराची काळजी घेतली. आता बारामतीसह राज्याच्या जनतेची काळजी घेण्याची ताकद मला मिळावी.'**

### पार्थ पवार यांच्याकडून संताप

**» काँग्रेसने उमेदवार उभा केल्याने युवा नेते पार्थ पवार यांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले, 'कोणाबरोबर बोलणे झालेले नाही. काय करायचे, ते त्यांना कळायला हवे. ते काय करत आहेत, ते सगळ्यांना माहीत आहे. सगळे मोठे लोक आहेत, सगळ्यांना समजते की काय चालले आहे. त्यांना काय करायचे ते करू द्या; पण नंतर काय त्रास होईल ते महाराष्ट्रात दिसेल.'**

# पुरंदर विमानतळासाठी वनजमिनीच्या मंजुरीचा प्रस्ताव सादर!

## MIDC कडून फॉरेस्ट क्लिअरन्ससाठी प्रस्ताव : 3200 शेतकऱ्यांकडून तीन हजार एकर जमीन देण्यास संमती

**पुणे | प्रतिनिधी**

प्रतिनिधी : पुरंदर तालुक्यात प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या वनजमिनीच्या मंजुरीसाठी हालचालींना वेग आला आहे. एकूण १२८५ हेक्टर जमीन संपादनाच्या प्रक्रियेत असताना, त्यापैकी ३८.५० हेक्टर वन विभागाच्या जमिनीच्या वापरासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) वन विभागाकडे फॉरेस्ट क्लिअरन्ससाठी प्रस्ताव सादर केला आहे.

या विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांमधील सुमारे ३२०० शेतकऱ्यांनी तीन हजार एकर जमीन देण्यास संमती दर्शविली आहे. या जमिनीच्या मोबदल्यासाठी राज्य सरकारने सुमारे सहा हजार कोटी रुपयांचे कर्ज HUDCO या वित्तीय संस्थेकडून घेण्यास मंजुरी दिली आहे. मात्र, या निधीची प्रत्यक्ष उपलब्धता अद्याप झालेली नसून, जिल्हा प्रशासन निधीच्या प्रतीक्षेत आहे. निधी प्राप्त होताच तो थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.



दरम्यान, निधी उपलब्ध होण्यापूर्वीच जमीन संपादन प्रक्रियेला गती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे एकीकडे आर्थिक तरतूद आणि दुसरीकडे प्रशासकीय प्रक्रिया अशा दोन्ही पातळ्यांवर हालचाली सुरू असल्याचे दिसून येते. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या १२८५ हेक्टर क्षेत्रापैकी ३८.५० हेक्टर जमीन ही वन विभागाच्या मालकीची असून, या गवताळ क्षेत्राच्या रूपांतरणासाठी केंद्रीय पोर्टलवर प्रस्ताव अपलोड करण्यात आला आहे. वनजमिनीचा वापर बदलण्यासाठी पर्यावरणीय आणि वन विभागाच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

सध्या हा प्रकल्प प्राथमिक टप्प्यात असून, वन विभागाकडून प्रस्तावासंदर्भात काही अतिरिक्त कागदपत्रांची मागणी करण्यात आली आहे. ही पूर्तता झाल्यानंतर प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी नागपूर येथील वन विभागाकडे पाठविण्यात येणार आहे. अंतिम पर्यावरणीय आणि वन मंजुरी मिळाल्यानंतरच प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात होईल, अशी शक्यता प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे

### शेतकऱ्यांची संमती, निधीची प्रतीक्षा

**» विमानतळासाठी सात गावांतील सुमारे ३२०० शेतकऱ्यांनी तीन हजार एकर जमीन देण्यास संमती दर्शविली आहे. मोबदल्यासाठी राज्य सरकारने HUDCO कडून सुमारे सहा हजार कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले असले तरी प्रत्यक्ष निधी अद्याप उपलब्ध झालेला नाही. निधी मिळाल्यानंतर तो थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केला जाणार आहे. त्यामुळे प्रशासन आर्थिक आणि प्रशासकीय अशा दोन्ही पातळ्यांवर काम करत आहे.**